


दत्तात्रय बबनराव धनकवडे
मा. महापौर, पुणे

दिनांक: / /२०
दि. २५/०८/२०१७

प्रति,

मा. ना. नितीनजी गडकरी साहेब
मंत्री, रस्ते, महामार्ग व जहाज वाहतुक,
भारत सरकार.

यांस.....

विषय :– पुणे–सातारा रस्त्यावर कात्रज चौक येथे उड्डाणपुल/ग्रेड सेप्रेटर उभारणे बाबत.

महोदय,

पुणे शहरामधुन जाणाऱ्या महामार्गाबाबत दिल्ली येथे महाराष्ट्र भवनामध्ये ९ सप्टेंबर २०१५ रोजी आपल्या अध्यक्षतेखाली व मा. ना. प्रकाश जावडेकर सो, मा. पालकमंत्री गिरीषजी बापट सो, मा. शरदराव पवार सो, मा. अजितदादा पवार सो. व सर्व खासदार आणि आमदारांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. त्यामध्ये **चांदणीचौक, कात्रज चौक, सुस रस्ता,** येथील उड्डाणपुलांची कामे NHAI मार्फत करण्याचे ठरले व तसे आदेश आपण आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांनाही दिले.

त्यानंतर या बाबतचे सर्व डिझाईन व इस्टीमेंटस् पुणे महानगरपालिकेने NHAI ला सादर केलेले आहेत. त्यामधील चांदणी चौक येथील उड्डापुलास मान्यता झाली परंतु कात्रज येथील उड्डाणपुल /ग्रेड सेप्रेटर त्याला अजुन मान्यता मिळालेली नाही. सदर ठिकाणी उड्डाणपुल /ग्रेड सेप्रेटर होणे अत्यंत गरजेचे आहे. मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. तरी आपण याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, हि विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित

श्री. दत्तात्रय धनकवडे
मा. महापौर, पुणे.
सभासद, पुणे म.न.पा

ऑफिस : (०२०)२४३७०८८९ मनपा कार्यालय : (०२०)२५५०१०१० मोबाइल : ९४२२०३५२७८, ९६८९९३५७१४ फॅक्स : (०२०)२५५०
Email: mayorpune@punecorporation.org


@AjitPawarSpeaks
2 BHK
2 BHK
चौक